## नियमीत दिवाणी दावा क्रमांक १२५/२०१३

(श्रीमती महिराजबी आबालाल पठाण वि. यासन अकबर मुलाणी व इतर)

**CNR-MHSNO6001971-2020**

## निशाणी क्रमांक ९२ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६ नियम ९ प्रमाणे दावा मिळकतीची मोजणी उप अधिक्षक, भूमि अभिलेख, मिरज, जि.सांगली यांच्यामार्फत होवून मिळणेकरिता केला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे, प्रस्तुत दावा दिनांक २८/११/२०१६ रोजी न्यायालयाने मंजुर केला होता. प्रतिवादी यांनी सदर न्यायनिर्णयावर नाराज होवुन मा. जिल्हा न्यायालय, सांगली यांच्या समोर अपील दाखल केले होते. मा. जिल्हा न्यायालयाने अपील मंजुर करुन दावा पुन्हा सुनावणीकरीता प्रस्तुत न्यायालयात पाठवलेला आहे. त्यांच्या आदेशाप्रमाणे वादींचा गट क्र.४९७/१, प्रतिवादी यांचा गट क्र.४९८ त्यांच्या मिळकतीच्या लगतचे गट क्र.४९७/२, ५१० व ४९२ यांची मोजणी तालुका अधिक्षक, भूमि अभिलेख, मिरज यांच्यामार्फत होवुन मिळण्याकरीता वादींनी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे देवुन योग्य ते आदेश पारीत करावे, अशी विनंती केली.

४. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. मा. जिल्हा न्यायालय, सांगली यांनी नियमित दिवाणी अपील क्र.१२/२०१७ हे प्रतिवादींचे अपील मंजुर करुन वादी, प्रतिवादी व लगतच्या मिळकत धारकांच्या गटांची

एकत्रीत मोजणी करुन घ्यावी व नंतर दाव्याची पुन्हा सुनावणी घ्यावी, असे निर्देशित केलेले आहे. त्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे. तथापि, मा. जिल्हा न्यायालयाने निर्देशित केल्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, मिरज, जि. सांगली यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे म्हैशाळ, ग्रामपंचायत हद्दीतील वादींचा गट क्र.४९७/१, प्रतिवादी यांचा गट क्र.४९८ त्यांच्या मिळकतीच्या लगतचे गट क्र.४९७/२, ५१० व ४९२ या शेत जमीन मिळकतींची संयुक्त मोजणी करुन त्याचा सविस्तर अहवाल मोजणी नकाशासह व अतिक्रमण असल्यास ते मोजणी नकाशात स्पष्टपणे दर्शवून सदर आदेश झाल्यापासून दोन महिन्याच्या आत सादर करावा.

४. वादी व प्रतिवादींनी मोजणीचे शुल्क परस्पर भूमि अभिलेख कार्यालय, मिरज येथे भरावे.

५. वादी व प्रतिवादींनी योग्य ती कागदपत्रे न्यायालयीन आयुक्तांना देवून मोजणीस सहकार्य करावे.

६. येणेप्रमाणे कमिशन रिट पाठवावे.

**सही/–**

मिरज — (स्वाती भा. नाईकनवरे–गरड)

दिनांक ०१/०९/२०२१ — सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav, Grade-3 |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 01/09/2022. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 01/09/2022. |
| Order uploaded on. | : | 03/09/2022. |